दैनिक लोकशाहीचा श्वास... भ्रष्टाचाराचा विनाश...

# प्रवक्ता लोकशाहीचा

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्याग,संघर्ष आणि लेखनीला समर्पित...

● मुख्यसंपादक– नितीन रावण मुजमुले ● मो.नं. 9673210438

Email :- pravaktalokshahicha@gmail.com
Web:- https://pravaktalokshahicha.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -५८ शुक्रवार दि.०७ नोव्हेंबर २०२५ आरएनआय-एमएचएमएआर/२५/ए२३६९ किंमत २ रू । पाने ४

Beed (Maharashtra) DAILY MARATHI Year-01 Issue -58 FRIDAY DT07 NOVEMBER 2025 RNI : MHMAR/25/A2369 PRICE - 2 RUPEES PAGES - 4

# मनोज जरांगेंचा झोपेत घात करण्याचा प्लॅन, एका मोठ्या नेत्याचा हात? जीवे मारण्यासाठी अडीच कोटींची सुपारी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटीलयांना आलेल्या जीवेमारण्याच्या धमकी प्रकरणी मोठी माहिती समोर आली आहे. जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यासाठी बीड शहरात काही दिवसांपूर्वी गुप्त बैठकाही घेण्यात आल्या असल्याची माहिती खुद्द आरोपींनी दिलीय. यात जरांगे पाटलांच्या ओळखीतील काही जण उपस्थित होते. त्याच बैठकीत अडीच कोटी रुपयांची सुपारी ठरली होती, अशी ही माहिती जरांगे यांनी दिली.

**खुने २ वर्षे होता जेलमध्ये**

कोपर्डी बलात्कारातील आरोपीवर न्यायालयाच्या परिसरात हल्ला केल्याप्रकरणी अमोल खुने हा आरोपी होता. त्याने आपल्या इतर सहकाऱ्यांसह हा हल्ला केला होता. तेव्हा तो जरांगेच्या शिवबा संघटनेचा कार्यकर्ता होता. या प्रकरणात तो दोन वर्षे जेलमध्ये होता. बाहेर आल्यानंतर खुने याने जरांगे पाटील यांच्यासोबत पुन्हा काम सुरू केले होते. आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान १५ एप्रिल २०२४ रोजी अमोल खुनेवर हल्ला झाला होता. यावेळी जरांगे यांनी खुनेला पोलीस संरक्षणाची मागणी केली होती.

**असा उघड झाला प्रकार**

बीड जिल्ह्यात मनोज जरांगे पाटलांच्या हत्येचा कट रचण्यात आला. यासंदर्भात तेथे काही गुप्त बैठकाही झाल्या. या बैठकीत जरांगे पाटील यांच्या जवळचा एक कार्यकर्ता उपस्थित होता. त्यानेच आंतरवाली सराटी येथे जरांगे पाटील यांची भेट घेऊन या प्रकाराची त्यांना माहिती दिली.



**एका मोठ्या नेत्याचा हात?** –मनोज जरांगे यांच्या आरोपानुसार, हा सगळा कट एका मोठ्या नेत्यांने रचला होता, त्याचे पुरावे देखील आपल्याकडे असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. आज सकाळी ११ वाजता अंतर्वली सराटीचे पत्रकार परिषद घेतील पुरावे ही सादर करतील, असं त्यांनी सांगितलं आहे. हा नेता कोण? त्याचं नाव थेट जरांगे पाटील घेणार का? जरांगे यांच्याकडे असलेले हत्येच्या कटाचे पुरावे पत्रकार परिषदेत समोर आणणार का? या सगळ्या प्रश्नाचे उत्तर आता पत्रकार परिषदमध्ये मिळतील.

### झोपेत घात करण्याचा प्लॅन?

या कटात जो सहभागी होता त्यानेच जरांगे पाटलांना या सर्व प्रकाराची माहिती दिली. तुम्ही जरांगे पाटील यांच्या जवळ असता, मग त्यांना झोपेचे किंवा गुंगीचे औषध देऊन पुढचे काम करा, अशा सूचना सुपारी देणाऱ्याने दिल्या अशी माहिती समोर आली आहे. हि माहिती ज्याने दिली त्याचे नावही जरांगे पाटील यांच्याकडे आहे. तसेच सर्व कॉल रेकॉर्डिंग देखील आहेत.

### महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता

राज्यात या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. कारण मनोज जरांगे पाटील हे सध्या मराठा आरक्षणाच्या चळवळीचे प्रमुख चेहरे आहेत आणि त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर मोठं आंदोलन झालं आहे. त्यामुळे त्यांच्या हत्येचा कट रचल्याचा प्रकार समोर येणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.


# सौ. वृषालीताई नितिन जायभाये नगराध्यक्ष पदाच्या निश्चित उमेदवार

## एस.सी. महिलांसाठी नगराध्यक्ष पद आरक्षित झाल्यामुळे प्रस्थापित घराणे 'शहां' च्या राजकारणाला पूर्णविराम

बीड /प्रतिनिधी

सर्व डाव्या पक्षांना, पुरोगामी विचारांच्या तसेच शाहू,फुले,आंबेडकर आणि अण्णाभाऊंच्या विचारांच्या चळवळीतील सर्वांना सोबत घेऊन नगर अध्यक्षपदासह पूर्ण नगरपालिकेची निवडणूक बीड शहर बचाव मंच जनाधारावर व जनतेच्या आशीर्वादांवर लढवणार अशी आज घोषणा करण्यात येत आहे. मरहूम आदरणीय अतहर बाबर साहेबांच्या जाण्यानंतर त्यांच्यासोबतच नगरपालिकेत निस्वार्थ, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभार संपुष्टात आला. पुन्हा म्हणून आजतागायत निस्वार्थ, जनतेच्या सेवा उद्देशाने, भ्रष्टाचार मुक्त, पारदर्शक कारभार बीड नगरपालिकेमध्ये कधीच झाला नाही. कायम भ्रष्ट व्यवस्था निर्माण करून प्रदीर्घ असा तीन पिढ्यांचा काळ एकाच घराण्याने तिथे सत्ता भोगली. कायम मनमानी पद्धतीने भ्रष्टाचारी व्यवस्था निर्माण करत नगरपालिकेला तसेच शासनाच्या येणाऱ्या सर्व निधींना लुटण्याचा कार्यक्रम चालवला गेला. अलीकडच्या काळामध्ये सुद्धा रस्त्याची बोगस बिले उचलणे, एकाच रस्त्याची किंवा कामाची तीन-तीन वेळेस बिले उचलणे, अटल अमृत जल योजना व भुयारी गटार योजनां सारख्या अनेक योजना ज्यासाठी शासनाचा शेकडो कोटी





रुपये निधी उपलब्ध झाला होता अशा सर्व योजना प्रस्थापित घराण्यांनी गिळंकृत केल्या. विकासाच्या नावाखाली सातत्याने बीड शहराला भकास करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहरांमध्ये अनेक समस्या आहेत. शहराला पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासह घनकचऱ्याचा व नियमित सफाईच्या कामांचाही प्रश्न फार मोठ्या संकट स्वरूपामध्ये सातत्याने भेडसावत आहे. मुस्लिम बहुल वार्डांमध्ये रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, सफाई व सर्वच मूलभूत सुविधांच्या विकासाच्या कामांच्या अभावी मानवी' जीवन स्तर हेतू पुरस्सर पद्धतीने प्रचंड ढासळवण्यात आला आहे. आपले मुस्लिम बांधव, महिला-भगिनी ज्येष्ठ थोर आणि लहान मुले प्रचंड हाल अपेष्टा सहन करत आहेत. ज्येष्ठ थोर व लहान मुले यांच्यात सातत्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आपल्याला दिसून येतात. एकंदर आपल्या सर्वांच्या पुढच्या पिढीचे भवितव्य या सर्व घराणे 'शहां' नी धोक्यात आणले आहे. या सर्व भ्रष्ट व्यवस्थेला आळा घालण्याची आता वेळ आलेली आहे. जनतेने जागृत होणे फार गरजेचे आहे. आपल्या पुढच्या पिढीचे भविष्य-भवितव्य आपल्याच हातात आहे. सर्वांनी आपल्या पुढच्या पिढीच्या चांगल्या भवितव्याचा विचार करत चांगले लोकप्रतिनिधी व चांगली नगराध्यक्षा निवडून देण्याची गरज आहे. आपल्या सर्वांच्या व आपल्या पुढच्या पिढीच्या भवितव्याचा विचार करत बीड शहर बचाव मंच सर्व पुरेगामी विचारांच्या चळवळीतील लोकांना सोबत घेऊन योग्य उमेदवाराचा पर्याय आपल्याला देत आहे. तरी सर्व चळवळीतील लोकांच्या सहकार्यावर व जनाधारावर नगर अध्यक्षपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवार 'सौ. वृषालीताई नितिन जायभाये' यांना आपण सर्वांनी प्रचंड

# वंचित बहुजन आघाडी बीड नगरपालिकेत स्वबळावर निवडणूक लढणार

बीड /प्रतिनिधी

शहरातील राजकीय समीकरणांना नवा कलाटणी देणारा निर्णय घेत वंचित बहुजन आघाडीने बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. आज दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या इच्छुक उमेदवारांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला.

बैठकीचे अध्यक्षस्थान वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी भूषविले. त्यांनी सांगितले की, बीड नगरपालिकेतील २८ संभाव्य उमेदवारांची पडताळणी करण्यात आली असून लवकरच १० उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली जाणार आहे.

अजय सरवदे यांनी सांगितले की, संविधान व लोकशाही वाचविण्याच्या लढ्यात वंचित बहुजन आघाडी सज्ज आहे. बीड शहरात आमचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांना मानणारा मोठा जनसमूह आहे. या जनाधाराच्या बळावरच आम्ही स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे.नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अनुसूचित जाती (महिला)



प्रवर्गासाठी जाहीर झाले असून, या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार निर्णायक ठरू शकतो. सरवदे म्हणाले की, जर महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडीला योग्य प्रतिनिधित्व दिले असते, तर बीड नगरपालिकेतील नगराध्यक्ष महाविकास आघाडीचा झाला असता. मात्र आता आघाडीतील मतभेदांमुळे त्रिशंकू स्थिती निर्माण होणार असून, या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच निर्णायक भूमिका बजावेल. शेवटी त्यांनी विश्वास व्यक्त केला की, वंचित बहुजन आघाडी बीड शहरात लोकाभिमुख, प्रामाणिक व पारदर्शक कारभार करणारे पर्याय देईल. बीड नगरपालिकेमध्ये 'क्षीरसागर मुक्त' प्रशासन निर्माण करण्याचा आमचा निर्धार आहे.

ही घोषणा झाल्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून, बीड शहरातील आगामी निवडणुकीत नव्या राजकीय समीकरणांची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.यावेळी शहराध्यक्ष लखन जोगदंड,महासचिव खंडू नाना जाधव, संदीप जाधव,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, पुरुषोत्तम वीर, डॉ.नितीन सोनवणे,सम्यक विद्यार्थी जिल्हाध्यक्ष रोहन मगर, माथाडी कामगार जिल्हाध्यक्ष आकाश जावळे, प्रेम कांबळे,महिला जिल्हाध्यक्ष अनिताताई चक्रे ,उपाध्यक्ष पुष्पाताई तुरुकुमारे, राणी बचुटे, रूपाली साबळे, मिलिंद सरपते, प्रकाश उजगरे, सुशील काकडे, शेख निहाल, सय्यद अन्वर पाशा, आधी उपस्थित होते

# इस्लामपुरातील मुस्लिम बांधवांचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेत वाढता सहभाग



बीड /प्रतिनिधी

जातीपातीच्या पलिकडील कार्य करत असलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे क्रांती सेना महाराष्ट्र राज्य या संघटनेत मुस्लिम बांधवांचा वाढता सहभाग पाहायला मिळत आहे. जिल्हा अध्यक्ष प्रकाश दादा धुताडमल यांच्या नेतृत्वाखाली संघटना सर्व समाजघटकांमध्ये जनसंपर्क वाढवित आहे.

आज बीड शहरातील इस्लामपुरा भागात उगवत्या नेतृत्वाचे प्रतीक असलेल्या सादिक भाई यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास प्रकाश दादा धुताडमल उपस्थित होते. या वेळी नगरसेवक इलियास भाई यांनी त्यांचा सत्कार करून सन्मानित केले.

राजकीय चर्चेदरम्यान इलियास भाई म्हणाले, आपले काम अत्यंत प्रभावी आहे. आपल्या कार्याची चर्चा सर्वत्र होत आहे. असाच जनहिताचा मार्ग कायम ठेवा. त्यांनी मुस्लिम बांधवांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेसोबत जोडून कार्य करण्याचे आवाहन केले आणि स्वतः या संघटनेसोबत राहण्याचा विश्वास व्यक्त केला.


या कार्यक्रमात बीड शहराध्यक्ष फहाद भाई, इब्राहिम भाई सय्यद, आयान सय्यद, सादिक भाई यांसह अनेक मुस्लिम बांधव उपस्थित होते. या प्रसंगी जिल्हा अध्यक्ष प्रकाश दादा धुताडमल यांनी सर्वांचे आभार मानून मुस्लिम समाजातील तरुण शक्ती संघटनेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत राहील असा विश्वास व्यक्त केला. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे क्रांती सेना आता बीड जिल्ह्यात सर्व समाजघटकांचा सहभाग वाढवत नवी दिशा घेऊ लागली आहे.

# दहा वर्षातील सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या कुशल अभ्यासू व्यक्तिमत्व

## वैभव सोनवणे यांची अजित दादा पवार साहेब गटाच्या बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक बीड जिल्हा संघटक पदी नियुक्ती

बीड /प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेले लोकांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होणारे व जिल्हा प्रशासनातील सर्व ऑफिसच्या माध्यमातून बीड तालुका व जिल्हा स्तरावरून आलेल्या त्यांच्याकडे व्यक्तीचे प्रशासनातील कामे सोडून देऊन न्याय मिळवून देणारे व तसेच मंत्रालयातील कामाचा दांडगा अभ्यास असलेले तसेच मंत्री संजय जी बनसोडे साहेबांचे अतिशय निकटवर्तीय असलेले प्रशासनातील सर्व माहिती असलेले असे अभ्यासू व्यक्तिमत्व तसेच लोकांच्या सातत्याने प्रशासनाच्या सर्व योजना गोरगरीब सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचणारे आणि सर्व लोकांच्या हितांचे प्रश्न शासन प्रशासन दरबारामध्ये मांडून ते प्रश्न सोडवण्यामध्ये यशस्वी ठरलेले असे कुशल अभ्यासू व्यक्तिमत्व बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील व बीड तालुक्यातील सर्व युवकांचे हृदय स्थान असलेले मा वैभव जी सोनवणे साहेब यांच्या या उत्कृष्ट कामाची पोचपावती म्हणून त्यांना आज रोजी म्हणजेच दिनांक ०६.११.२०२५ रोजी माननीय श्री महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य अजित दादा पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाच्या बीड जिल्हा संघटक पदी वैभव जी सोनवणे यांची आज नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली हे नियुक्तीपत्र बीड जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बळीराम जी गवते साहेब यांनी दिले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण सर तसेच डॉक्टर योगेश भैया क्षीरसागर साहेब सह मान्यवर हे यावेळी उपस्थित होते नियुक्त पत्र दिल्यानंतर बळीरामजी गवते यांनी



वैभव सोनवणे यांचे अभिनंदन करून बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाची एक चांगली साखळी व सर्वत्र जाळे निर्माण कराल व सर्वसामान्य लोकांना शासन प्रशासन दरबारी आपण जसा मागील दहा वर्षात आपण आपल्या उत्कृष्ट समाजसेवेच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे तशाच इथून पुढे देखील तसाच सर्वसामान्य बीड जिल्ह्यातील नागरिकांना न्याय इथून पुढे देखील मिळवून द्याल व सर्व लोकांच्या अडीअडचणी आपण जाणून घेऊन शासन प्रशासन दरबारी चांगल्या प्रकारे सोडवाल अशी अपेक्षा मा बळीराम गवते यांनी व्यक्त केली व पुढील कार्यास बळीराम गवते यांनी शुभेच्छा दिल्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा राजेश्वर चव्हाण साहेब यांनी देखील वैभव सोनवणे यांचे अभिनंदन करून पुढील उत्कृष्ट कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच येथे उपस्थित असलेले डॉक्टर योगेश भैया क्षीरसागर साहेब यांनी देखील वैभव सोनवणे यांच्या मागील असलेल्या दहा वर्षातील सामाजिक कार्याचे कौतुक करून पुढील सामाजिक कार्यासाठी व बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र राष्ट्रवादी काँग्रेस मा श्री अजित दादा पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाची ताकत वाढवण्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या यावेळी बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली जुगार!

प्रतिनिधी @ गडब



मोबाईल ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या जुगार रॅकेटवर अलिबाग स्थानिक गुन्हे शाखेने मोठी आणि नियोजनबद्ध कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ३५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी मोबाईल फोन आणि ३ हजार १८० रुपयांची रोख रक्कम असा एकूण १८ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे . अलिबाग गुन्हे शाखेची मोठी कारवाई; ३५ जणां मिळालेल्या माहितीनुसार, येहा-अष्टमी मार्गावरील योगेश्वरी रसवंतीगृहाजवळ आडोशाला संभे (ता. रोहा) येथील नितेश सानप हा इतरांकडून ऑनलाईन पैसे स्वीकारून फनगेम आणि फनरेप या मोबाईल ॲप्सच्या माध्यमातून जुगाराचा गोरखधंदा चालवत असल्याची माहिती रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी मोरेश्वर उमले यांना मिळाली होती.

उमले यांच्या पथकाने तत्काळ कारवाई करत रोहा तालुक्यातील विविध ठिकाणी छापे टाकले. त्यातून ऑनलाईन जुगाराचे मोठे जाळे उघडकीस आले. प्राथमिक चौकशीत नितेश सानपकडे सापडलेल्या मोबाईल फोनमध्ये 'फेअरडील' नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपमधील ३३ सदस्य ऑनलाईन जुगार खेळवत असल्याचे आढळून आले. या तपासानंतर नितेश सानप (संभे), शिल्पेश पोवाळे (अलिबाग), शिवाजी पवार (रोहा) यांच्यासह एकूण ३५ जण या जुगार नेटवर्कमध्ये सामील असल्याचे स्पष्ट झाले. या सर्वांकडून मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १८ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींनी मोबाईल ॲपच्या माध्यमातून लोकांकडून पैसे घेऊन जुगार खेळवला असल्याचे तपासात समोर आले असून, सर्वांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अविनाश पाटील करीत आहेत. आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, या प्रकरणात आणखी काही व्यक्तींचा सहभाग असल्याची शक्यता असून तपास सुरू आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेतील रविंद्र मुंढे, मोरेश्वर उमले, संदीप पहलेकर, लालासो वाघमोडे, बाबासो पिंगळे आणि ओमकार सोंडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या समन्वयातून ही कारवाई यशस्वीपणे पार पडली.

### व्हॉट्सॲप चॅटबॉट सुरू

रायगड पोलिसांनी नागरिकांना गुन्हेगारी व बेकायदेशीर कृत्यांविरोधात सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांना थेट पोलिसांशी संवाद साधता यावा म्हणून 'रायगड दृष्टी' हा व्हॉट्सॲप चॅटबॉट सुरू करण्यात आला आहे. या सेवेसाठी ९६२००३२३२३ या क्रमांकावर नागरिक आपल्या परिसरातील मटका, जुगार, अंमली पदार्थ, अवैध दारू व्यापार किंवा इतर बेकायदेशीर कृत्यांविषयी माहिती पाठवू शकतात. पोलिसांनी दिलेली माहिती पूर्णतः गोपनीय ठेवली जाईल, असे स्पष्ट केले.



आष्टी (प्रतिनिधी)

नवी मुंबई खारघर पोलीस ठाणे येथे तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित असलेले साहित्यिक कवी लेखक आणि विचारवंत महाराष्ट्र पोलीस दलातील स्थित कार्यरत नवी मुंबई गुन्हे शाखेत असलेले पोलीस अधिकारी उत्तमराव दासू तरकसे यांचा ५५ वा. वाढदिवस नवी मुंबई येथील खारघर पोलीस ठाणे येथे विश्व मांगल्ये सभा यांच्या माध्यमातून सौ. मेघनाताई, सौ. प्राचीताई, सौ. मैथिली आणि सौ. सुचिताताई यांनी समाजभूषण उत्तमराव दासु तरकसे यांचे खारघर पोलीस स्टेशनमध्ये रांगोळी काढून त्यांचे औक्षण करत त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा साजरा केला.

## संपादकीय

# भाविकांची चेंगराचेंगरी

तीन दिवसांपूर्वी आंध्र प्रदेशमधील श्रीकाकुलम जिल्ह्यात व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १२ भाविकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचे कारण अरुंद प्रवेशद्वार, बांधकाम चालू असलेला परिसर आणि प्रशासकीय हलगर्जीपणा असल्याचे मानले जात आहे. देव मंदिरात बाराही महिने असतो. तो कुठेही जात नाही. भक्त कधीही ये-जा करू शकतात, देव 'भक्तीचा भुकेला' असतो, अशी ही कल्पना आहे. तरीही यात्रा, एकादशी, तिथीला मंदिरांमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण मिळविताना कोणत्याही भागातील प्रशासनावर मर्यादा पडणे स्वाभाविकच असते. उपलब्ध जागेच्या क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाली, की चेंगराचेंगरी होणे स्वाभाविकच आहे. त्यातून अफवा, पुढे जाण्याची घाई, गर्दीमुळे निर्माण झालेला उकाडा, श्वास घेण्यासाठी होणारा त्रास व त्यातून पळापळ प्रसंगी एकमेकांना अक्षरश: तुडवतच गर्दी मार्गक्रमण करत असते. त्यातून मृत्यूकांड होते. काही काळ हळहळ व्यक्त केली जाते. चर्चांना उधाण येते, काही दिवसांनी पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती त्या ठिकाणी पाहावयास मिळते.

ऑगस्ट २००३ मध्ये नाशिकच्या कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ यात्रेकरूंचा मृत्यू झाला होता. म्हणजे या घटना दक्षिण अथवा उत्तर भारतात घडतात, अशातला भाग नाही. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात २००५ साली मांढरदेवी येथील काळुबाई देवस्थानाच्या ठिकाणीही अशा प्रकारची चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली होती. त्या दुर्घटनेत तर जवळपास ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू तर २५० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते. दरवर्षी शाकंभरी पौर्णिमा मेळ्यानिमित्त काळुबाई मंदिरात लाखो भाविक जमतात. त्यावर्षी देवीला नारळ आणि बकरे अर्पण करण्यासाठी जवळजवळ दोन लाख लोक जमले होते, कोणीही अशा प्रकारची दुर्घटना घडावी अशी इच्छा केली नसती. मंदिरात फक्त स्टॉलने वेढलेल्या एका अरुंद गल्लीतून प्रवेश करता येतो. दुपारनंतर सुरू झालेल्या चेंगराचेंगरीमुळे, आतील गर्भगृहात जाणाऱ्या पायऱ्यांवर साचलेले नारळपाणी आणि दिव्याचे तेल निसरडे झाले.

## केज तालुक्यातील संतापजनक घटना

# सतरा वर्षाच्या तरुणाला मोटार सायकलवर शेतात नेवून जातीवाचक शिवीगाळ करून केली लोखंडी रॉड आणि चपलेने मारहाण !

माफी मागायला लावून केले व्हिडिओ रेकॉर्डिंग : चौघा विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यात अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या युवकाला दोघांनी मोटार सायकलवरून शेतात नेवून त्याला चौघांनी लोखंडी रॉड आणि चपलेने मारहाण करून त्याला माफी मागायला लावून मोबाईलमध्ये त्याचा व्हिडिओ काढला असल्याची संतापजनक घटना घडली आहे. या प्रकरणी चौघा विरुद्ध ट्रॉसिटीसह मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील एकुरका येथील उमेश अशोक कोकाटे हा सतारा वर्षाचा युवक साारणी (सांगवी) येथील विठ्ठल विद्यालय सारणी येथे अकरावी कला शाखेत शिक्षण घेत आहे. दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता उमेश व त्याची आई घरी असताना, त्यांच्या गावातील त्याच्या ओळखीचे सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशिराम मोरे हे दोघे मोटरसायकल वरून त्याच्या घरी आले. पेंडीचे पोते आणायचे आहे. तु आमच्या सोबत चल. असे त्याला म्हणाले असता उमेशने त्यांना नकार दिला. त्यामुळे त्यांनी त्याच्याशी ओढाओढी केली. त्यांची उमेशला होत असलेली ओढाओढी पाहून उमेशची आई तेथे आली. तिने तुम्ही त्याच्या सोबत अशी झटापट का करता ? असे म्हणताच त्या दोघांनी उमेशच्या आईला ढकलून दिल्याने ती खाली पडली. त्यात उमेशच्या आईचे कपडे फाटले. त्या नंतर त्यांनी उमेशला तुझे वडील आमच्या शेतात आहेत. तेथे एक काम आहे. तु आमच्या सोबत चल. असे म्हणाले आणि त्यांनी बळजबरीने उमेशला दोघांच्यामध्ये मोटार सायकलवर बसवून शेतात घेऊन गेले. शेतात गेल्या नंतर सचिन मोरेने गाडी थांबताच उमेशला गाडीवरून ढकलून दिले. उमेश खाली पडताच त्या दोघांनी त्याला अभिमान मोरे व तुळशिराम मोरे दोन्ही रा. एकुरका यांच्या समोर घेऊन गेले. त्यांनी उमेशला जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तुळशिराम मोरे याने सचिन मोरे याच्या हातातील लोखंडी रॉड व चपलेने त्याला बेदम मारहाण केली. तसेच त्या चौघांनी मिळून उमेशला चापट बुक्क्यांनी मारहाण केली.

या प्रकरणी उमेश कोकाटे याने दि. ४ नोव्हेंबर रोजी केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशिराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे आणि तुळशिराम केशव मोरे सर्व रा. एकुरका तालुका केज यांच्या विरुद्ध गु र नं ६०८/२०२५ ट्रॉसिटी कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्ही ए) यासह भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा केज उपविभागाचे विभागीय पोलिस अधिकारी आयपीएस व्यंकटराम हे तपास करीत आहेत. मुलीला मेसेज केल्याचा संशय :- उमेश कोकाटे याने एका मुलीला मोबाईल वरून मेसेज केल्याच्या संशयातून उमेशला बेदम मारहाण करण्यात आली.

माफी मागायला लावून त्याचा व्हिडिओ केला :- उमेश कोकाटे याला मारहाण करून त्याला त्यांची माफी मागायला लावत त्याचा व्हिडिओ मोबाईल मध्ये शूट केला. असा उल्लेख तक्रारीत असून तो व्हिडिओ अद्याप माध्यमांच्या हाती आलेला नाही.

उमेश बेशुद्ध पडताच त्याच्या वडिलांना बोलावून घेतले :- सचिन मोरे, अभिमान मोरे, गणेश मोरे व तुळशिराम मोरे या चौघांनी उमेश मोरे याला लाथाबुक्क्यांनी आणि लोखंडी रॉड व चपलेने बेदम मारहाण केल्या नंतर उमेश बेशुद्ध पडला. त्या नंतर घाबरून त्यांनी उमेशचे वडील अशोक कोकाटे यांना फोन करून बोलावून घेतले आणि त्याला वडिलांच्या ताब्यात दिले.

# निवडणुकीकरीता इच्छुक उमेदवारांनी अर्ज घेऊन जावे- खुर्शीद आलम

प्रतिनिधी @ बीड



शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे नेते शरदचंद्रजी पवार यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष मा. शिंदे साहेब यांचे सुचनेनुसार व बीडचे लोकप्रिय आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के साहेब व मा.आ. सलीम साहेब यांच्या सूचनेप्रमाणे बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक करिता बीड शहरातील नगरसेवक, नगरसेविका व नगराध्यक्ष पदांकरिता निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या जिल्हा कार्यालयातुन उमेदवारी अर्ज आज दि.६ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता घेऊन जावे असे आवाहन शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी केले आहे.

नगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका पदाकरिता इच्छुक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज शरद पवार राष्ट्रवादी पक्ष कार्यालयातूनच नाममात्र शुल्क भरून घ्यावा. पक्ष कार्यालयातून घेतलेला अर्जच ग्राह्य धरण्यात येईल असेही शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी कळवले आहे.

नगरसेवक, नगरसेविका व नगराध्यक्ष पदांकरिता निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी आज ६ नोव्हेंबर २०२५ रोजी या कार्यकालात नाममात्र शुल्क भरून अर्ज घ्यावेत. सदरील पक्ष उमेदवारी अर्ज हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा कार्यालय बीड येथे उपलब्ध आहेत असे आवाहन राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा बीड नगरपरिषदेचे माजी सभापती खुर्शीद आलम यांनी कळवले आहे,



# राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा बक्षीस वितरण

प्रतिनिधी @ बीड

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतर्गत धिनस्त जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांचे विद्यमाने व जिल्हा राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने दिनांक ०१ ते ०२ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, बीड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत १७ वर्षाखालील मुले व मुली राज्यस्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न झाला.

सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम जिल्हा परिषद, बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांचे हस्ते, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यगर, जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव शकील अहेमद, गोपाळ धांडे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना सातत्याने खेळाचा सराव करून विविध स्पर्धेमध्ये यश संपादन केले पाहीजे. खेळ खेळल्याने शरीर व मन तंदुरूस्त राहत. ज्या संघानी प्राविण्य मिळविले त्या संघातील खेळाडूंचे कौतूक करून खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य मिळवून राज्याचे नाव उंचवावे अशी अपेक्षा व्यक्त केले. जे संघ पराभूत झाले, ज्या खेळाडूंची राज्य संघात निवड झाली नाही त्यांनी नाराज न होता खचून न जाता पुढच्या वेळेस जोमाने खेळ करत यश संपादन करावे असे प्रतिपादन केले.

सदर स्पर्धेत मुलांच्या वयोगटात प्रथम क्रमांक छत्रपती संभाजीनगर विभाग (विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काळेगाव हवेली, ता. जि. बीड, द्वितीय क्रमांक कोल्हापूर विभाग (माध्यमिक आश्रमशाळा आष्टा, जि. सांगली तर तृतीय क्रमांक - नागपूर विभाग निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागपूर, जि.नागपूर सदर स्पर्धेत मुलींच्या वयोगटात प्रथम क्रमांक पुणे विभाग (मिलेनियम नॅशनल स्कुल ॲण्ड जुनियर कॉलेज जि. पुणे), द्वितीय क्रमांक -लातूर विभाग (छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव, जि. धाराशिव तर तृतीय क्रमांक कोल्हापूर विभाग (द्रविड हायस्कुल, वाई, ता. वाई, जि. सातारा) जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यगर यांनी प्रास्तविकामध्ये सदर स्पर्धे विषयी सविस्तर माहिती देवून सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात मान्यवर मंडळी उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद व्यक्त करून आभार मानले .

सदर स्पर्धा हया दोन दिवस चालू राहिल्या. सदर स्पर्धेत राज्याच्या आठ विभागातून आठ मुले व आठ मुलींचे संघ, प्रत्येक विभागातून ०५ मुले व ०५ मुली निवड चाचणीसाठी सहभागी झाले. सदर स्पर्धेतून क्रीडासंचालनालयामार्फत नियुक्त तज्ञ निवड समिती सदस्यांमार्फत महाराष्ट्र राज्याचा मुला व मुलींचा पुढील प्रमाणेनिवडण्यात आला. सदर संघ उत्तरप्रदेश बरेली येथे दि. ११ ते १५ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत होणा-या राष्ट्रीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे.सदर स्पर्धेकरिता राज्य संघ निवड चाचणी सदस्य म्हणून नाजुक उईक, गणेश खैरमोडे, अनिकेत बोडखे, धनंजय माळी, अंजली पाटील, पंच म्हणून जब्बार पठाण, काझी अकरम, सुनिल मुलानी, ताज पठाण, शहाबाज पठाण, विठ्ठल कावरे, प्रशांत सिरसाठ, वहिद शेख, प्रविण कोरडे हे काम पाहत आहेत.

# माजी आ.भीमराव धोंडे यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात ११ नोव्हेंबरला होणार प्रवेश!

प्रतिनिधी @ पाटोदा

आष्टी,पाटोदा,शिरूर का.मतदार संघाचे भाग्यविधाते तथा शिक्षण महर्षी,माजी आ. भीमराव धोंडे यांचा प्रमुख ५०० कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार ) पक्ष ११ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रवेश होणार आहे. मुंबईतील राष्ट्रवादी भवनामध्ये हा पक्षप्रवेश सोहळा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार,प्रदेशाध्यक्ष यांच्या आदि मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे. या पक्ष प्रवेश सोहळ्याची बीड जिल्ह्यासह राज्यभर चर्चा सुरू झाली आहे.या पक्षप्रवेशामुळे राजकारणातील अनेक राजकीय समीकरणे बदलणार आहेत.त्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे तर भविष्यातील निवडणुकांमध्ये फार मोठा परिणाम या निमित्ताने पाहायला मिळेल असा अंदाज राजकीय जाणकारांकडुन व्यक्त होत आहे.माजी आ.भीमराव धोंडे हे गेल्या ४० वर्षाहून अधिक काळ सक्रिय राजकीय नेते म्हणून राजकारणात आहेत.राजकारण करताना त्यांनी समाजकारणाला अधिक महत्त्व देऊन विकासाच्या अनेक संकल्पना आष्टी,पाटोदा,शिरूर का.विधानसभा मतदार संघामध्ये राबवल्या.विविध शैक्षणिक संस्था,आरोग्य क्षेत्रातील विविध महाविद्यालय युवकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन,भव्य व्यायाम शाळा, कृषी महाविद्यालय सुरु केले आहे. शेतकऱ्यांसाठी साखर कारखान्यासाठी सध्या संघर्ष उभा केला आहे.एक अभ्यासू, शांत,शिस्तप्रिय आणि विकासाची गंगा मतदार संघात आणण्यासाठी एक निश्चित ध्येय ठेवून चालणारा राजकारणी अशी भीमराव धोंडे यांची ओळख महाराष्ट्राच्या राजकारणात आहे.आष्टी विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरसुद्धा त्यांची लोकप्रियता कायम राहिली.

आष्टी,पाटोदा, शिरूर का. विधानसभा मतदार संघातील कार्यकर्त्यांच्या चर्चेतून आणि आग्रहावरून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करावा अशी इच्छा सर्वाकडुन व्यक्ती केली जात होती.या सर्वांचा आदर करत माजी आ.भीमराव धोंडे यांनी येत्या ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथील राष्ट्रवादी भवनांमध्ये प्रमुख ५०० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये आणि मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संपर्क कार्यालयातुन मिळली आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार हे सत्ता पक्षातील अत्यंत आक्रमक धडाडीचे नेते म्हणून ओळखले जातात.त्यांच्या पक्षातून त्यांच्या माध्यमातून विकास करण्यासाठी शक्ती आणि बळ मिळेल आणि सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर आणि सर्व घटकांना अपेक्षित न्याय मिळेल अशी अपेक्षाही या निमित्ताने माजी आ. धोंडे यांनी व्यक्त केले आहे.यानंतर मात्र मतदार संघातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलणार असून भीमराव धोंडे यांना मोठे यश प्राप्त होईल असा राजकीय अंदाज आहे.माजी आ. भीमराव धोंडे हे भाजपमधून निलंबन केल्यानंतरसुद्धा त्यांनी भाजपात पुनर्प्रवेशासाठी प्रयत्न केला परंतु विधानसभा अपक्ष लढवल्याने भाजपचे आ.सुरेश धस यांनी लेखी पत्र देऊन भाजपामध्ये प्रवेश देऊ नये असे म्हटले.ना.पंकजाताई मुंडे यांच्याकडून सुद्धा वरिष्ठ स्तरावरून भीमराव धोंडे यांच्या भाजप पक्ष प्रवेशासाठी प्रयत्न झाला नाही म्हणून अखेर सत्ताधारी पक्षातच प्रवेश घेण्याचा निर्णय माजी आ. भीमराव धोंडे यांनी घेतला आणि त्याला ११ नोव्हेंबरचा मुहूर्तही मिळाला आहे.



५०० प्रमुख कार्यकर्त्यांसह मुंबईतील राष्ट्रवादी भवनात ना. अजितदादांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

### राजकीय समीकरणे बदलणार!

माजी आ.भीमराव धोंडे यांचा आष्टी, पाटोदा,शिरूर का. विधानसभा मतदार संघात मोठा मतदार आहे एक संयमी,शांत,शिस्तप्रिय आणि विकासाभिमुख नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. सत्ताधारी पक्षातील उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील प्रवेशाने येत्या काळात होणाऱ्या विविध निवडणुकां मधून याचा प्रत्यय येईल.यानिमित्ताने राजकीय समीकरणे मात्र नक्की बदलणार हे मात्र निश्चित!

# घोसपुरीत दिवसाढवळ्या घरफोडी; दागिन्यांसह मोठा ऐवज लंपास

**प्रतिनिधी @ अहिल्यानगर**

**अज्ञात चोरट्याविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; परिसरात भीतीचे वातावरण**

नगर तालुक्यातील घोसपुरी (घोडके बाडी) परिसरात एका बंद घरात दिवसाढवळ्या धाडसी चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करत, घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी एका ६० वर्षीय महिलेने (मूळ रा. घोसपुरी, सध्या रा. वाघोली, पुणे) नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला कामानिमित्त घराबाहेर गेल्या होत्या. हीच संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप (किंवा तत्सम लॉक) तोडून आत प्रवेश केला.

चोरट्याने घरातील कपाटात ठेवलेले मौल्यवान ऐवज आणि रोकडवर हात साफ केला. यामध्ये ६० हजार रुपये किमतीचे एक सोन्याचे मणी मंगळसूत्र, ५४ हजार रुपये किमतीची एक सोन्याची बांगडी, ३० हजार आणि २४ हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या चेन, १८ हजार रुपयांची एक सोन्याची अंगठी, तसेच प्रत्येकी ३० हजार रुपये किमतीचे कानातील झुबे आणि वेल असा एकूण २ लाख ४६ हजार रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. यासोबतच घरातील २० हजार रुपयांची रोख रक्कमही चोरट्याने चोरून नेली.

बुधवारी (दि. ५) दुपारी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर, पीडित महिलेने तात्काळ नगर तालुका पोलीस ठाणे गाठून घडलेल्या घटनेची तक्रार दिली. पोलिसांनी घटनेची गांभीर्याने नोंद घेत, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३३१ (३) आणि ३०५ (अ) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हादाखल केला आहे. ऐन दिवसाढवळ्या झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे घोसपुरी परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गांगुर्डे हे करत आहेत



धाराशिव - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नूतन जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह (भैय्या) पाटील यांची धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ नेते मसूद भाई, शेख कादर भाई खान माजी नगराध्यक्ष खलिफा कुरेशी, माजी नगरसेवक बाबा मुजावर, इस्माईल भाई शेख शहराध्यक्ष आयाज बबलू भाई शेख वाजिद भाई पठाण अन्वर भाई शेख अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष तौफिक शेख उस्मानाबाद शहर अध्यक्ष इस्माईल काझी व वाहेद भाई शेख उपस्थित होते.




# श्रावण एस.तायडे सर यांचा 'राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' ने सन्मान

**प्रतिनिधी @ मलकापुर**

आंतरराष्ट्रीय नामांकन (आय एस ओ २०१५) प्राप्त डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया द्वारा आयोजित भव्य सोहळ्यामधे श्रावण एस.तायडे सर यांना 'राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. स्वतः हालाखीच्या परिस्थिती मधे त्याकाळात एम. ए. एम. एड. पर्यंत शिक्षण पूर्ण करून ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे, शिक्षण क्षेत्रात अभुतपूर्व कामगिरी व सामाजिक कार्य, जनसामान्याच्या अडचणींची जाणीव ठेवून त्या पूर्ण करण्याची धडपड या उल्लेखनीय कार्यासाठी श्रावण एस.तायडे सर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मलकापूर येथील भातृ मंडळ हॉलमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# 'हे'च करताहेत कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाची माती!

**प्रतिनिधी @ अहिल्यानगर**

**काय तर म्हणे भारत कृषीप्रधान देश! बळीराजाचं रक्त पिणाऱ्या कोण चिरडणार?**

एकीकडे कृषीप्रधान देश असल्याचा टेंभा मिरवायचा, शेतकऱ्याला बळीराजा म्हणायचं आणि दुसरीकडे त्याच बळीराजाचं ढेकणासारखं रक्त प्यायचं, असा उद्योग आपल्या देशात आणि राज्यात सुरु असल्याचं सध्या पाहायला मिळत आहे. दिवाळीच्या आधी काही दिवस राज्यातल्या अनेक भागांतला शेतकरी कापसाची लागवड करतो. दिवाळी गोड व्हावी, घरातल्या चिमुकल्यांना नवे कपडे घ्यावेत आणि त्यासाठी चार पैसे मिळतील, ही आशा बळीराजाची त्यामागे असते. परंतू बळीराजाच्या या आशेची निराशा करण्यासाठी आणि त्याचं रक्त पिण्यासाठी अनेक ढेकणं टपलेलेच असतात. यामध्ये कापूस खरेदी केंद्राचे संचालक सर्वात पुढे असतात. एकंदरीत काय तर 'हे'च खऱ्या अर्थानं कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाची माती करताहेत. अशा परिस्थितीत आपला भारत हा कृषीप्रधान देश फक्त सांगण्यापुरताच राहिला आहे. खरा प्रश्न हा आहे, की बळीराजाचं रक्त पिणाऱ्या ढेकणांना कोण चिरडणार?

नेवासे तालुक्यातल्या सोनईत बोटांवर मोजण्याइतकी कापूस विक्री खरेदी आहेत. मात्र या कापूस खरेदी केंद्रांच्या संचालकांमध्ये कापसाच्या भावाबद्दल बिलकुल एकवाक्यता आढळून येत नाही. वास्तविक पाहता सरकारने ८ हजार १०० इतका कापसाचा भाव निर्धारित जाहीर केलेला आहे. मात्र सोनईतल्या या विविध कापूस खरेदी केंद्रांवर कापसाच्या भावासंदर्भात खूपच तफावत पाहायला मिळत आहे. एकाने ६ हजार ९०० भाव सांगितला तर दुसरा ७ हजार १०० सांगतो. तिसरा ६ हजार ८०० सांगतो तर चौथा ६ हजार ७०० कापसाचा भाव असल्याचं सांगतो. सरकारने निर्धारित केलेल्या भावाचा हे केंद्र संचालक अजिबात विचार करत नाहीत.

कापूस खरेदी केंद्र चालक त्यांच्या मनाप्रमाणे कापसाला भाव देत आहेत. स्टँडर्ड कापूस ७ हजार १००, थोडासा भिजलेला पिवळा पडलेला कापूस ६ हजार ७०० तर लेंड्या आणि पानं असलेला कापूस ६ हजार ५०० किंवा त्यापेक्षा कमी भावाने खरेदी केला जातो. रात्रंदिवस कष्ट करुन ऊसनवारी करत वेळप्रसंगी दागिने गहाण ठेवून कापसाचं पीक आणण्यासाठी प्रचंड मेहनत शेतकरी घेतो आणि या मेहनतीतून फुलवलेल्या पिकाचा भाव ठरविण्याचा अधिकार व्यापारी आणि दलालांकडेच असतो. शेतकऱ्याला तो अधिकार नसतो, लोकशाहीची ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. एका कापूस खरेदी केंद्र चालकाने तर चक्क जिनिंग कंपन्या आणि केंद्र सरकारवरच खापर फोडलंय.

जिनिग कंपन्यांना पडतळ (नफा किंवा मार्जिन) राहत नाही. त्यामुळे ते आमच्याकडून कमी भावाने कापूस घेतात, असं या कापूस खरेदी केंद्र चालकाचं म्हणणं आहे. दरम्यान, केंद्र सरकारने कापसाच्या गाठी आयात करण्याचा जो निर्णय घेतला, त्याचा दुष्परिणाम कापसाच्या भावावर झाल्याचं त्या कापूस खरेदी केंद्र चालकानं सांगितलं. म्हणजे सारं काही शेतकऱ्याच्याच मुळावर येत असल्यास दिसत आहे.शेतकरी फक्त कष्टाचाच मालक राहिला असल्याची परिस्थिती सध्या पाहायला मिळत आहे. सरकार शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव देत नाही. अतिशय कमी नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांची चेष्टा केली जात आहे. या देशात शेतकऱ्यांचा कोणीच वाली राहिलेला नाही. परंतू शेतकऱ्यानं जर धान्य पिकवलंच नाही तर तुम्ही आम्ही काय खाणार, हाच खरा प्रश्न आहे

# नागेशेबंधु साठी कपडे व उबदार पांघरून माणुसकीचं नातं जपणारा उपक्रम

**प्रतिनिधी @ कळंब**

दसरा दिवाळी हा सण आपणाकडे उत्साहाने साजरा झाला परंतु आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे , कौटुंबिक समस्येमुळे अनेक लोकानां या सणाचा आनंद येत नाही, समाजामधील एकाएकी, जीवन जगणाऱ्या लोकांसाठी अनेक संस्था कार्य करतात परंतु या संस्था सर्व लोकांपर्यंत पोहोचू शकत नाहीत अशा गरजू लोकांचा शोध घेऊन त्यांना मदत करावी हे विचार घेऊन कार्य करणारे अनाथ आश्रमाचे संचालक व ज्येष्ठ नागरीक महासंघाचे जिल्हा अध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांनी उपेक्षित , व मदतीची गरज असलेल्या दोन बंधूंचा आगळावेगळा असा माणुसकीचं नातं



जपणारा, सत्कार केला.

हा उपक्रम दि.४ नोव्हेंबर रोजी आडत बाजार ( मोंढा ) या ठिकाणी घेण्यात आला ,कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती होते कळंब येथे गेली ५० पन्नास वर्षे गाय - गुरे सांभाळणारे प्रकाश रामभाऊ नागीशे वय ६५ यांचा शर्ट, धोतर, टोपी , शाल, व कळंब आडत बाजारात दुकानाची राखण करून उपजीविका करणारे अनिल रामभाऊ नागीशे ६२ वय यांचा शर्ट, पॅन्ट,टोपी देऊन सत्कार केला यासाठी सेवानिवृत्त प्रा. विश्वासराव जाधवर,यांनी दातृत्व कार्य केले. तर या उपक्रमामुळे प्रभावित होऊन आडत व्यापारी जुगल किशोर मालपाणी यांनी थंडीचे दिवस असल्याने या दोन बंधूंसाठी उबदार पांघरून मायेची रघ दोघांना यावेळी भेट दिल्या, या उपक्रमात महादेव महाराज अडसूळ, प्रा.विश्वासराव जाधवर, माधवसिंग राजपूत, आडत व्यापारी व बहुजन वंचित आघाडीचे अण्णा शेळके, व्यापारी लक्ष्मण फल्ले, दत्ता फल्ले, संकेत शिंदे, जुगल किशोर मालपाणी यांनी सहभाग घेतला , समाजात अनेक उपेक्षित वंचित गरजू लोक आहेत त्यांचा शोध घेऊन, मदत व्हायला हवी असा संदेश या उपक्रमातून मिळाला अशी प्रतिक्रिया या प्रसंगी उपस्थित लोकांनी व्यक्त केली.

# आम आदमी पार्टीची नगरपरिषद निवडणुकीसाठी जोरदार तयारी

## माजी सैनिक अशोक येडे,जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

**प्रतिनिधी @ बीड**

आम आदमी पार्टीने बीड जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पक्षाने नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांना संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भात माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी - बीड यांनी माहिती देताना सांगितले की, आम आदमी पार्टी महाराष्ट्रातील सर्व निवडणुका स्वबळावर आणि स्वातंत्र्याने लढणार आहे.ते पुढे म्हणाले की, नगरपरिषद निवडणुकीत आम आदमी पार्टीच्या तिकिटावर उमेदवारी दाखल करण्याची इच्छा असलेल्या कार्यकर्त्यांनी, तरुणांनी आणि नवयुवकांनी तात्काळ



संपर्क: ९४०५४५८७२१, ९७ ६७ ८१ ५७ २७, ९४ २२ ५९ १८ ०९ या नंबर वर आपण संपर्क करू शकता.एकत्र येऊ, स्वच्छ राजकारण घडवू. आम आदमी पार्टी जनतेचा आवाज असे आवाहन माजी सैनिक अशोक येडे यांनी केले आहे.



युवा नेतृत्व सागर आप्पा धस यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना उत्तम शेठ पठाडे, राजेंद्र लाड दिसत आहेत.

# पवनचक्कीचे कॉपर केबल चोरणारी टोळी जेरबंद; पोलिसांनी असा लावला सापळा

## ४ गुन्हे उघडकीस; ५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त, मुख्य सूत्रधारासह तिघे अटकेत

**प्रतिनिधी @ अहिल्यानगर**

जिल्ह्यातील पारनेर व आसपासच्या परिसरात पवनचक्क्यांच्या टॉवरवरील मौल्यवान कॉपर केबलची चोरी करून धुमाकूळ घालणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. ङउइ ने या टोळीचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली असून, त्यांच्याकडून ४ गुन्हे उघडकीस आणत ५ लाख २५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, शहाजांपुर (ता. पारनेर) शिवारातील सुजलान कंपनीच्या टॉवरवरून २० जून ते ११ सप्टेंबर २०२५ दरम्यान अज्ञात चोरट्यांनी कॉपर केबल चोरून नेली होती. याप्रकरणी श्री संतोष भिका लंके (वय ४६, रा. हंगा, ता. पारनेर) यांनी सुपा पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली होती.

जिल्ह्यात कॉपर वायर चोरीच्या घटना वाढल्याने पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे यांनी ङउइ ला गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, पो.नि. श्री. किरणकुमार कवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली ङउइ चे रमेश गांगडे, फुरकान शेख, अतुल लोटके, गणेश लवडे, रिचर्ड गायकवाड, भिमराज खसें, भाऊसाहेव काळे, अमोल कोतकर, अरुण मोरे तसेच सुपा पोलीस स्टेशनचे मेघराज कोल्हे, योगेश सातपुते यांचे पथक तयार करण्यात आले.

पथकाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत असताना, सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील गुन्हेगार अतुल विश्वनाथ शिंदे (रा. शहांजापुर) याने केल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने सापळा रचून अतुल विश्वनाथ शिंदे (वय ३५, रा. शहांजापुर), संकेत बाळासाहेब म्हस्के (वय २२, रा. पिंपळगाव कौंडा) आणि अनिकेत शशिकांत गवळी (वय ३०, रा. शहांजापुर) यांना सुपा येथून ताब्यात घेतले.त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी सदरचा गुन्हा इतर साथीदारांसह केल्याची कबुली दिली. यामध्ये ऋषीकेश सुनिल पवार (रा. पिंपळगाव कौंडा, फरार), अरुण शिवाजी गवळी (रा. शहांजापुर), पप्पु वावाजी जाधव, प्रवीण सावकार म्हस्के, श्रीकांत संपत साठे (रा. हंगा) स्वप्नील पवार व अक्षय सकट (फरार) यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलिसांनी आरोपींकडून ५,२५,६००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ताब्यात घेतलेल्या तिन्ही आरोपींना पुढील तपासासाठी सुपा पोलीस स्टेशनच्या हवाली करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ङउइ व सुपा पोलिसांनी केली आहे



सोलापूर - आमदार सुभाष बापू देशमुख यांचे चिरंजीव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीषभैया देशमुख यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष रामकाका जाधव, जिल्हा सरचिटणीस गणेश भोसले, शिवबा संघटना सोलापूर जिल्हा अध्यक्ष अजित सुरवसकर, ग्रामपंचायत सदस्य विशाल जाधव, नंदकुमार गुंड, दिनेश वाले, सोनू पंथ यलगुंडे,नजीर मुलाणी, अनिकेत जाधव इ उपस्थित होते.

दैनिक लोकशाहीचा श्वास... भ्रष्टाचाराचा विनाश...
प्रवक्ता लोकशाहीचा
शुक्रवार दि.०७ नोव्हेंबर २०२५
FRIDAY DT07 NOVEMBER 2025



# प्रभाग क्र. ४ मधून अनिल भाऊ निसर्गन यांचे नाव चर्चेत; स्वच्छ प्रतिमा आणि समाजाभिमुख कार्यामुळे जनतेचा वाढता विश्वास

**सध्या बीड शहरात सर्वत्र एकच चर्चा रंगली आहे. प्रभाग क्रमांक ४ मध्ये जनतेचा उमेदवार कोण? तर उत्तर एकच अनिल भाऊ निसर्गन!**



**पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या चर्चेतही त्यांच्या नावाचा सकारात्मक उल्लेख होत असून, पक्ष संघटनेच्या पातळीवरून त्यांच्या उमेदवारीबाबत विचार सुरू असल्याचे समजते. अनिल भाऊ निसर्गन यांच्या नेतृत्वात प्रभाग क्रमांक ४ मध्ये विकास, संवाद आणि सामाजिक सलोखा वाढेल, असा विश्वास जनतेत दिसत आहे.**

बीड /प्रतिनिधी

नगरपरिषद बीड निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) मध्ये सध्या उमेदवारीबाबतची हालचाल वेगाने सुरू आहे. विशेषतः बीड शहरातील प्रभाग क्रमांक ४ मध्ये एक नाव सध्या जनतेत जोरदार चर्चेत आले आहे ते म्हणजे अनिल (भाऊ) निसर्गन.

साधी राहणीमान, स्वच्छ प्रतिमा आणि समाजाभिमुख कार्य या बळावर अनिल भाऊ निसर्गन यांचे नाव स्थानिक जनतेत तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चेचा विषय बनले आहे.

अनिल भाऊ निसर्गन हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना जसे की रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रवणबाळ योजना, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या इतर योजना, प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. बीड शहरातील गोरगरीब, वंचित, उपेक्षित घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचाव्यात, यासाठी त्यांनी अनेकदा स्वतःच्या प्रयत्नांतून जनजागृती मोहीम राबवली.

अनिल भाऊ निसर्गन यांचे सामाजिक कार्य केवळ शासकीय योजना अंमलबजावणीपुरते मर्यादित नाही. समाजातील न्याय व कायदा व्यवस्थेप्रती आदर ठेवत, त्यांनी पोलीस ठाण्यात येणाऱ्या वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठीही पुढाकार घेतला, हे त्यांच्या जनतेशी असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

त्यांच्या या प्रामाणिक कार्यामुळे ते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे विश्वासू आणि एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा संपर्क घनिष्ठ असून, पक्ष संघटनेच्या प्रत्येक उपक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. बीड शहरातील प्रत्येक समाजघटकात त्यांचा सन्मानाने उल्लेख केला जातो.

अनिल भाऊ निसर्गन यांचे कार्य केवळ राजकीय नाही तर सामाजिक आणि लोकाभिमुख आहे. ते शिव, फुले, शाहू, आंबेडकर, आणि अण्णाभाऊ यांच्या विचारांचे निष्ठावंत अनुयायी आहेत. या महापुरुषांच्या विचारसरणीवर चालत त्यांनी समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना जनतेत रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. चळवळीशी एकनिष्ठ राहून समाजासाठी काम करणे हीच त्यांची ताकद बनली आहे.

त्यांच्या नेतृत्वात अनेक सामाजिक उपक्रम राबवले गेले आहेत झोपडपट्टी भागात स्वच्छता मोहिमा, शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, विधवा व निराधार महिलांसाठी मदत मोहीम, तसेच युवकांसाठी रोजगार मार्गदर्शन शिबिरे. या सर्व उपक्रमांतून ते 'जनतेचा माणूस' म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत.

सध्या प्रभाग क्रमांक ४ मध्ये जनतेतून, सामाजिक संघटनांमधून आणि कार्यकर्त्यांमधून अनिल भाऊ निसर्गन यांना राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) कडून उमेदवारी द्यावी अशी जोरदार मागणी होत आहे. त्यांच्या कार्यशैलीबद्दल बोलताना स्थानिक नागरिक सांगतात की, त्यांनी कधीही पक्षाचा बिल्ला दाखवून मदत केली नाही, तर माणूस म्हणून प्रत्येकाच्या पाठीशी उभे राहिले.


उच्च शिक्षण घेतलेले आणि तितकेच उच्च विचारांचे असणारे अनिल भाऊ हे साध्या राहणीमानातूनही लोकांपर्यंत पोहोचले आहेत. समाजात त्यांचा वावर सहज आणि सर्वसमावेशक आहे. प्रामाणिकपणा, समर्पण आणि जनतेशी जवळीक हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मुख्य वैशिष्ट्य मानले जाते.

# लो.अण्णाभाऊ साठे सभागृहाचा ८ नोव्हेंबर रोजी लोकार्पण सोहळा

केज /प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, क्रांती नगर, कानडी रोड, केज ठिकाणी या सभागृहाचे भव्य लोकार्पण व उद्घाटन सोहळा शनिवार दि.०८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ठीक ०३:३० वाजता, मा. रमेशराव आडसकर साहेब व ऍड. गोरक्ष जी लोखंडे यांचे शुभ हस्ते आयोजित करण्यात आलेला आहे. सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त असे हे सभागृह क्रांती नगरच्या विकासाचे नवे पर्व ठरणार आहे. उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून मा.रमेशरावजी आडसकर साहेब चेअरमन, अंबा. सह. साखर कारखाना यांचे आध्यक्षते खाली तसेच उद्घाटक म्हणून ड.गोरक्षजी लोखंडे साहेब सचिव दर्जा, अनुसूचित जाती जमाती आयोग महाराष्ट्र शासन-मुंबई,व मा. आ. पृथ्वीराज जी साठे साहेब, नगराध्यक्षा मा. सीताताई बनसोड, नगर पंचायत केज, मा. हारूनभाई इनामदार, गट नेते, जनविकास आघाडी, तसेच मा. अजहर इनामदार, नगर सेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.) केज शहराध्यक्ष, मा.संदीपान तात्या हजारे रि.पा.ई बीड जिल्हा कार्याध्यक्ष, मा.राजेश घोडे आझाद क्रांती सेना, सुनील हिरवे री. पा. ई. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा.बाबुराव गालफाडे सर, ज्येष्ठ मार्गदर्शक, मा.सुनील हिरवे, मा. संतोष लांडगे युवा नेते, मा.रोहित कसबे, सामाजिक कार्यकर्ते, मा.अनिल लोखंडे आझाद क्रांती सेना, प्रा.रमेश पाटोळे, मा. महादेव लांडगे मा. नगरसेवक, मा.योगेश गायकवाड, सामाजिक, व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. केज शहरातील सर्व समाज बांधव यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवावी. असे आवाहन अशोक शिंदे, धीरज कांबळे, इरफान पठाण, अजय गालफाडे, सय्यद आखिल,

# प्रभाग १४ (अ) मधून डॉ. अमरेंद्र विद्यागर, तर प्रभाग १२ (अ) मधून अमर माने काँग्रेसकडून रिंगणात





बीड /प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाकडून जोरदार तयारी सुरू झाली असून, प्रभाग क्र. १४ (अ) मधून डॉ. अमरेंद्र द. विद्यागर, तर प्रभाग क्र. १२ (अ) मधून अमर अ. माने हे उमेदवार म्हणून मैदानात उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हे दोन्ही प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव असून, दोघेही या जागांसाठी प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

मागील अनेक वर्षांपासून भिम शक्ती संघटनेच्या माध्यमातून डॉ. विद्यागर आणि अमर माने यांनी आपल्या प्रभागांमध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. सर्वसामान्यांच्या सुखदुःखात त्यांनी सतत सहभाग घेतल्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली आहे.


नागरिकांच्या आग्रहावरून दोघांनीही आगामी नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर उतरायचा निर्णय घेतल्याचे समजते. स्थानिक प्रश्न रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी या विषयांवर ठोस काम करण्याची त्यांची भूमिका स्पष्ट असून, प्रत्येक नागरिकाचा आवाज बनून प्रभागाचा विकास हा आपला ध्यास आहे, असे दोघांनी सांगितले.

राजकीय जाणकारांच्या मते, दोघांची लोकप्रियता, लोकसंपर्क आणि सामाजिक कार्य पाहता, काँग्रेस पक्षासाठी या दोघांची उमेदवारी निर्णायक ठरू शकते. या निवडणुकीत या दोघांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रात्र नव्हे काळ वैऱ्याचा सुरू झालाय, तेव्हा थोडं जपून!

**एस.एम.युसूफ़ यांचे मतदारांना आवाहन**






बीड /प्रतिनिधी

नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली आहे. २ डिसेंबरला मतदान तर ३ डिसेंबरला निकाल घोषित होणार आहे. वेळ अत्यंत कमी असल्याने प्रचाराला जोर येणार आहे. यामुळे रात्र नव्हे तर काळ वैऱ्याचा सुरू झालेला आहे. तेव्हा मतदारांनी निवडणूक काळापासून ते निकाल लागेपर्यंत थोडं जपून रहावे असे आवाहन मुक्तपत्रकार

एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, कधी नव्हे ते यंदा फार मोठ्या लांबलचक खंडानंतर नगरपालिकेची निवडणूक लागली आहे. यापूर्वीच्या पंचवार्षिक निवडणुकीत निवडून आलेल्या नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा कार्यकाळ संपून चौथं वर्ष सुरू आहे. तेव्हा आता कुठे ही निवडणूक लागली आहे. या मोठ्या खंडामुळे नगरसेवक, नगराध्यक्ष होण्यासाठी अनेक हौसे, नवसे, गवसे गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झालेले आहेत. अनेक पक्ष आणि अनेक उमेदवार यावेळी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. प्रत्येक पक्ष आणि उमेदवार निवडून येण्यासाठी जीवाचा आटापिटा करणार आहेत. या काळात मतदार मनात असलेल्या व आवडणाऱ्या उमेदवारांना पुढे येऊन सहकार्य करतात. वास्तविक पाहता आपल्या भारत देशात गुप्त मतदान पद्धत असतानाही अनेक मतदार हे उघडपणे कुणाची बाजू घेऊन तर कुणाला विरोध करून निवडणुकीत रमताना दिसतात. निकाल लागल्यानंतर निवडून येणाऱ्याचे समर्थक आनंद व्यक्त करतात तर पडलेल्यांचे समर्थक हिरमुसले होऊन जातात. यानंतर मात्र निवडून आलेले आणि पडलेले असे सर्वचजण एक दुसऱ्यांच्या गळ्यात गळे घालून राजकारणाचा आनंद घेतात मात्र या दोघांनाही निवडणूक काळात समर्थन देणाऱ्यांमध्ये आपसात वैर निर्माण होते. असे चित्र प्रत्येक निवडणूकीनंतर दिसते वास्तविक पाहता निवडून येणारा वैयक्तिक तर सोडा सामाजिक कार्य सुद्धा व्यवस्थितरित्या करत नाही. तर पडलेला आपण पडलेलो आहे असे म्हणत समस्यांवरून, प्रश्नांवरून काढता पाय घेतो. अशा अवस्थेत सर्वसामान्य मतदारांचीच गोची होते आणि त्यांचे निवडून आलेल्या सह पडलेल्या सोबत आणि दोघांच्या कार्यकर्त्यांसोबतही पुढील निवडणुकीपर्यंत किंवा कायमस्वरूपी वैर निर्माण होते. ही बाब शहरातील अनेक प्रभागांमध्ये प्रत्येक निवडणुकीनंतर दिसून येते. तेव्हा मतदारांनो आता रात्र नव्हे काळ वैऱ्याचा सुरू झालाय तेव्हा थोडं जपून रहा कोणत्याही उमेदवारासाठी झटताना वैर निर्माण होणार नाही याची दक्षता घ्या असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

# वार्ड क्रं. ०९ मधून महेश शिंदे प्रभावी उमेदवार



बीड /प्रतिनिधी

शहरातील वार्ड क्रमांक ०९ मधून महेश शिंदे हे प्रभावी उमेदवार असून सध्या त्यांच्या नावाची चर्चा आहे. महेश शिंदे यांनी सामाजिक सलोखा ठेवत दरवर्षी आपल्या वाढदिवसा निमित्त रक्तदान, शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना ब्लड बॅग देऊन अनेक रुग्णांचा जिव वाचवला आहे. त्यासोबत वृक्षारोपण, अन्नदान, महिलांना साडी, चोळी, देऊन त्यांनी शेकडो लाडक्या बहिणींना मदतीचा हात दिला आहे. सोबत अडल्या नडलेल्या सर्व सामान्य लोकांची कामे पंतप्रधान घरकुल, रमाई घरकुल आवास योजना मंजूर करून दिले. वार्डात रस्त्याचे दर्जेदार काम अहोरात्र उभा राहून करून घेतले. वार्डात बोरवल टाकी, बसवल्या, नागरिकांचे राशन दुकानावर राशन कार्ड चालू केले. गरजू महिलांना पगारी चालू करून दिल्या. यासोबत वार्डामध्ये अमृत योजना राबविण्यात आली. तसेच आंबेडकर जयंती निमित्त त्यांनी मिरवणूक काढत बुद्ध विहार मध्ये शेकडो महिलांना साडी वाटप केल्या. लॉकडाऊन काळात वार्डामधील नागरिकांना किराणा किट वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, गरजून्ना ब्लँकेट वाटप, केल्या. वेळोवेळी वार्डामधील खांबावरील लाईट चालू करून घेतल्या. कोरोना सारख्या काळात सर्वसामान्य लोकांच्या मदतीला धावून जाऊन मदतीचा हात दिला. स्वच्छता अभियान, राशनसाठी सतत पाठपुरावा करत त्यांनी जनतेची कामे केली. उन्हाळ्यात पाणी प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी टँकरव्दारे प्रभागातील नागरिकांना पाणी पुरवठा केला. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या अडीअडचणीसाठी प्रत्येक वेळी धावून जात त्यांच्या कामासाठी पुढाकार घेणारे नेतृत्व म्हणून महेश शिंदे यांची ओळख प्रभागातील सर्वांना चांगलीच प्रचलित आहे. यामुळे महेश शिंदे हे वार्ड क्रं ०९ मधून प्रभावी उमेदवार असल्याची नागरिकात चर्चा होत आहेत.

# फसवणूक प्रकरणातील आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर



बीड /प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलिस ठाणे, बीड अंतर्गत दाखल फसवणुकीच्या प्रकरणातील आरोपींना मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.या प्रकरणात आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३४, ४२०, ४४७, ४४८, ४६५, ४६८, ४७१ अंतर्गत फसवणूक, खोटी कागदपत्रे तयार करणे व अतिक्रमणाचे गंभीर आरोप करण्यात आले होते. आरोपानुसार, आरोपींनी जमीन व्यवहारात फसवणुकीचा मार्ग अवलंबून खोटे दस्तऐवज तयार करून अतिक्रमण केले असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.

पोलीस तपास सुरू असताना अटकेची शक्यता लक्षात घेऊन आरोपींनी आपल्या बचावासाठी अँड. शेख सद्दाम शेख इस्माईल व अँड. आदर्श अरुण जाधव यांच्या मार्फत अटकपूर्व जामिनासाठी जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

दिनांक ०५/११/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान दोन्ही ८वकिलांनी आरोपींच्या वतीने प्रभावी युक्तिवाद मांडत न्यायालयासमोर सर्व बाबी स्पष्ट केल्या. युक्तिवाद ऐकून मा. न्यायालयाने प्रकरणाचा सखोल विचार करून ०६/११/२०२५ रोजी आरोपींना अटकेपासून संरक्षण देत अटकपूर्व जामीन मंजूर केला.

वकिल: अँड. शेख सद्दाम शेख इस्माईल, अँड. आदर्श अरुण जाधव न्यायालय: मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड गुन्हा क्र.: ३७६/२०२५ कलमे: ३४, ४२०, ४४७, ४४८, ४६५, ४६८, ४७१ भा.दं.सं. ही बातमी वक्ता लोकशाहीचा साठी योग्य प्रेस नोट स्वरूपातही मांडता येईल.

**पार्थ पवारांच्या कंपनीचा जमीन व्यवहार वादात**

# पार्थ यांनी स्वत: सही केलेली संबंधित कागदपत्रेही समोर, तरी गुन्ह्यात नाव नाही

मुंबई - अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठं वादळ निर्माण केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे या व्यवहारात केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क भरले गेले. या प्रकरणात गंभीर अनियमितता आढळल्याने सरकारने कारवाईचा बडगा उगारला असून, दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले आहे. या घडामोडींमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून विरोधकांनी अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणी बावधान पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यातील कोरेगाव पार्कमधील या जागेच्या विक्रीत अनेक नियमांचा भंग झाल्याचे आरोप आहेत. या प्रकरणात पोलिसांनी तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये अमेडिया कंपनीचा भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील, जमीन विक्रीसाठी मुखत्यार असणारी शीतल तेजवानी आणि निलंबित दुय्यम निबंधक आर.बी. तारू यांच्याविरोधात गुन्हे नोंदवले आहेत. त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४०९ (विश्वासघात), ३३४ आणि ३१६(५) तसेच इतर कलमांखाली गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, पार्थ पवार किंवा त्यांच्या कंपनीचं नाव या एफआयआरमधून वगळण्यात आलं आहे, ही बाब विरोधकांच्या रोषाचं कारण ठरली आहे.

तक्रारीनुसार, ६ कोटींच्या मुद्रांक शुल्काचा भरणा न केल्याचा आरोप आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असून, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन होणार आहे.

पार्थ पवारांना वाचवले जात आहे - सुषमा अंधारे

या प्रकरणावरून शिवसेना ठाकरे गटच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सरकार आणि चौकशी यंत्रणांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये या व्यवहाराशी संबंधित कागदपत्र शेअर करत म्हटले आहे की, पार्थ पवार यांनी स्वतः या व्यवहारावर सही केली आहे, तरीदेखील त्यांचं नाव एफआयआरमध्ये नाही. एकच दस्त वापरून जमीन नोंदणी करण्यात आली आणि जिल्हा इंडस्ट्री बोर्डाच्या मुद्रांक माफीच्या ठरावावर पार्थ पवारांची सही आहे, हे चौकशी अहवालात नमूद आहे. तरीदेखील त्यांचं नाव घेण्यापासून यंत्रणा का दूर राहिली? असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी पुढे म्हटले की, अमेडिया कंपनीत पार्थ पवार यांचा ९९ टक्के हिस्सा आहे आणि दिग्विजय पाटील फक्त एक टक्का भागीदार आहेत. तरीही दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करून पार्थ पवारांना वाचवले जात आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक मुजमुले नितीन रावण यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभु नगर, नेहरू चौक, परळी वैजनाथ, ता.परळी वै. जि.बीड बीड ता.जि.बीड येथे छापून कार्यालय : घर नं.५०४, बिल्डींग नं.१९६, कानोबा नगर, नाथापुर रोड, जीवनदीप सिनीअर कॉलेज, बीड ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - मुजमुले नितीन रावण